तरुण भारत

मंगळवार दि. १४ ऑगस्ट २०१८

# विद्यार्थ्यांनी इंटरनेटचा गैरवापर टाळावा!

## पोलीस अधीक्षक दीक्षितकुमार गेडाम यांचे आवाहन | दोडामार्ग हळबे कॉलेजचा वर्धापन दिन कार्यक्रम

**प्रतिनिधी**
दोडामार्ग

समाज घडविणारी व्यक्ती तरुण असते. तरुणांच्या हातात उज्ज्वल भविष्य आहे. आदर्श व्यक्ती बनण्यासाठी व ध्येय गाठण्यासाठी वेळेचे योग्य व्यवस्थापन केले पाहिजे. मोबाईल, इंटरनेटचा गैरवापर न करता त्याचा उपयोग चांगल्या गोष्टीसाठी करा. तुम्ही स्वत: जीवनात सक्षम होऊन आनंद मिळवा. तुमची समाजात ओळख निर्माण झाली नाही तर तुम्हाला कोणीही विचारणार नाही. त्यामुळे ध्येय मोठे ठेवून ते साकार करण्यासाठी परिश्रम करा, असे आवाहन सिंधुदुर्गचे जिल्हा पोलीस अधीक्षक दीक्षितकुमार गेडाम यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेटये होते. यावेळी व्यासपीठावर संस्था सदस्य भाई परमेकर, दोडामार्ग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष चेतन चव्हाण, दोडामार्ग पोलीस निरीक्षक श्री. सावंत्रे, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील,



**दोडामार्ग : प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांना गौरविताना जिल्हा पोलीस अधीक्षक दीक्षितकुमार गेडाम. सोबत अभिजीत हेगशेट्ये, भाई परमेकर आदी.**

### सत्कार अन् प्रकाशनही

- **पोलिसांत भरती झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार**
- **महाविद्यालयाचे न्युज बुलेटिन 'नवदर्पण'चें प्रकाशन**

सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. प्रशांत ढेपे, मातृमंदिर देवरुखचे सेक्रेटरी आत्माराम मेस्त्री उपस्थित होते.

दीपप्रज्वलन लक्ष्मीबाईच्या प्रतिमेचे पूजन व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले. त्यांनी महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास व पुढील धोरण विषद केले. अध्यक्षीय भाषणात अभिजीत हेगशेटये यांनी नवनिर्माणाची दृष्टी विद्यार्थ्यांना लाभली तर महाविद्यालयाचे व संस्थेचाही नावलौकिक वाढेल, असा आशावाद व्यक्त केला.

यावेळी बी. ए., व बी. कॉम.च्या तृतीय वर्षाच्या परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय आलेले विद्यार्थी तसेच पोलीस भरतीमध्ये नियुक्त झालेल्या नविता कानू बोडेकर, प्रीती अंकुश गवस व दीप्ती तुकाराम शेटकर या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या गरीब व होतकरू सहा विद्यार्थ्यांना युवती स्वयंनिर्भर निधीमार्फत अर्थसहाय्य करण्यात आले. त्याचे धनादेश मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आले.

येथील हळबे महाविद्यालयाचे न्यूज बुलेटीन 'नवदर्पण'चेही प्रकाशन यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

### प्राचार्य पाटील यांचा गौरव

प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षक 'श्री' हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच श्री. गेडाम यांचाही शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सोपान जाधव यांनी तर आभार प्रा. संजय खडपकर यांनी मानले.